प्रातःकाल
www.pratahkal.com

महिलांना बँकांमध्ये नोकरीची सर्वाधिक संधी मिळणार; आरबीआय गव्हर्नर शक्तिकांत दास यांचे आवाहन

नवी दिल्ली, दि. ५ (वृत्तसंस्था) : बँकिंग क्षेत्रात नोकरी करण्याची इच्छा असणाऱ्या महिलांसाठी दिलासा देणारी बातमी आहे. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तीकांत दास यांनी बँकांनी महिलांना जास्तीत जास्त नोकरी देण्यासाठी प्रयत्न करावेत, असे महत्वाचे आवाहन केले आहे.

वित्तीय क्षेत्र हे महिलांना अधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध करून तसेच महिला चालवत असलेल्या उद्योगांना प्रोत्साहन देऊन समाजातील लैंगिक असमानता दूर करू शकते, असे दास म्हणाले. इंडियन बँक्स असोसिएशन आणि FICCI यांच्या संयुक्त परिषदेला दास संबोधित करत होते प्रत्येक नागरिकाला सामाजिक-आर्थिक स्थितिद्वारे आर्थिक सेवांपर्यंत पोहोचता यायला हवे. तसेच आवश्यक वित्तीय साक्षरता देखील प्राप्त झाली पाहिजे हे विकसित भारतात पाहिले गेले पाहिजे. आस्थापनांच्या कामामध्ये जगाच्या तुलनेत महिलांचा सहभाग खूपच कमी आहे. ही तफावत कमी करण्यासाठी मुलींचे शिक्षण, कौशल्य विकास, कामाच्या ठिकाणी सुरक्षितता आणि सामाजिक अडथळे दूर करण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहेत.

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांपैकी एक पंचमांश (एमएसएमई) महिलांच्या नियंत्रणाखाली असूनही, महिला उद्योजकांना अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो, लैंगिक असमानता कमी करण्यासाठी आर्थिक क्षेत्राला महत्त्वाची भूमिका बजावावी लागेल, असे दास म्हणाले.

वित्तीय संस्थांमध्ये अधिकाधिक महिलांना रोजगार देऊन आणि विशेषतः महिला चालवत असलेले उद्योगधंद्यांना विविध योजनांचा लाभ देऊन ही विषमता दूर करायला हवी असे ते म्हणाले. बँकांना अधिकाधिक 'बँक सखी'ना सोबत घेण्याचे आवाहन दास यांनी केले.

भारताची सौंदर्य, वैयक्तिक आरोग्यनिगा उत्पादनांची बाजारपेठ वार्षिक १० ते ११ टक्के वाढणार

नवी दिल्ली, दि. ५ (वृत्तसंस्था) : सौंदर्य आणि वैयक्तिक आरोग्यनिगा (ब्यूटी अँड पर्सनल केअर) क्षेत्रातील जगातील सर्वांत मोठी चौथ्या क्रमांकाची बाजारपेठ असून भारताची सौंदर्य क्षेत्रातील वाटचाल एका महत्त्वाच्या टप्प्यावर आहे. उत्पादनांचा उच्च दर्जा, ग्राहकांची बदलती आवड आणि तंत्रज्ञानाची प्रगती या जोरावरच ही वाटचाल आतापर्यंत सुकर झाली आहे. पुढील पाच वर्षांत भारताची सौंदर्य, वैयक्तिक आरोग्यनिगा उत्पादनांची बाजारपेठ वार्षिक १० ते ११ टक्के वाढणार असल्याचे नायका ब्यूटी ट्रेंड्स रिपोर्टमधून निदर्शनास आले आहे. या अहवालात सौंदर्य आणि वैयक्तिक आरोग्यनिगा क्षेत्रात परिवर्तन घडवून आणणाऱ्या नऊ प्रमुख ट्रेंड्सवर प्रकाश टाकण्यात आला आहे. 'रेडसीर'च्या सहकार्याने तयार करण्यात आलेला हा अहवाल या क्षेत्रातील व्यापक घडामोडी, वाढीच्या प्रमुख घटकांचा शोध घेतो आणि उदयोन्मुख ट्रेंड्स उलगडतो. 'सद्यस्थितीत सौंदर्य आणि वैयक्तिक आरोग्यनिगा (ब्यूटी अँड पर्सनल केअर) उद्योगाची उलाढाल सुमारे २१ अब्ज डॉलर आहे. आगामी पाच वर्षांत ही बाजारपेठ वार्षिक १० ते ११ टक्के दराने वाढण्याची शक्यता आहे. ई-कॉमर्स क्षेत्राचीही दर वर्षी २५ टक्क्यांनी वाढ होण्याची अपेक्षा आहे. ग्राहककेंद्रीत धोरणे आणि नवनवीन ऑफर यांमुळे आगामी काळात या क्षेत्रांतील ब्रँडची मोठ्या प्रमाणावर भरभराट होण्याची शक्यता आहे,' अशी माहिती 'रेडसीर स्ट्रॅटेजी कन्सल्टंट्स'चे संस्थापक आणि सीईओ अनिलकुमार यांनी दिली.'जगातील प्रभावी आणि सर्वांत मोठी सौंदर्य उत्पादनांची बाजारपेठ होण्याकडे भारताची वाटचाल सुरू असून, भविष्यकाळाबाबत आम्ही कमालीचे आशावादी आहोत. आमच्या या ब्यूटी ट्रेंड रिपोर्टमधील निष्कर्षानुसार, आगामी काळात प्रीमियम उत्पादने, तंत्रज्ञान आणि ग्राहकांच्या अपेक्षा ही त्रिसुत्रीच या

पश्चिम रेल्वे

शुद्धिपत्रक

निविदा सूचना क्र. EL-TRD-W-118-24-25-5 dated 20.08.2024 उघडण्याची तारीख दि. ०४.०९.२०२४ (३.३० वा.) ते २०.०९.२०२४ (३.३० वा.) सुधारित केली आहे व सर्व निविदेच्या अन्य अटी अपरिवर्तीत राहतील. 0510

facebook.com/WesternRly

सार्वजनिक सूचना

आमचे अशीलाद्वारे, १) श्री. राजन गोपाळ सिंग २) मिस. पिंकी गोपाळ सिंग, हे विनय नगर, मिरा भाईंदर छेद रस्ता, मिरा रोड (पू.), जिल्हा ठाणे ४०११०७ येथे स्थित शितल कॉम्प्लेक्स ई–विंग को. ऑप. हाऊ. सोसा. लि. (प्रस्तावित), म्हणून ज्ञात सोसायटीमधील ई–विंग, सहावा मजल्यावरील फ्लॅट क्र. ६०३ च्या संबंधात समस्त जनतेला याद्वारे सूचना देण्यात येत आहेत (येथून पुढे सदर फ्लॅट संबोधण्यात येईल).

सदर फ्लॅट श्रीमती सोनू गोपाळ सिंग यांनी खरेदी केला होता. ज्याअर्थी मयत श्रीमती सोनू गोपाळ सिंग यांचे आपल्या मागे १) श्री. गोपाळ सिंग (पती) २) श्री. राजन गोपाळ सिंग (मुलगा) ३) मिस. पिंकी गोपाळ सिंग (मुलगी) हे हयात कायदेशीर वारस मागे ठेवून ०१/०६/२०२०४ रोजी निधन झाले.

ज्याअर्थी वारस श्री. गोपाळ सिंग यांनी यांनी सदर फ्लॅटचे अधिकार, हक्क आणि हित, नोंदणी क्र. टीएनएन–७–११०५२–२०२४ धारक १९/०६/२०२४ दिनांकित सोडपत्राद्वारे १) श्री. राजन गोपाळ सिंग २) मिस. पिंकी गोपाळ सिंगे यांच्या नावे सोडले. त्यामध्ये आमच्या अशीलाला सदर फ्लॅटचे विद्यमान मालक बनवले आहे. आमचे अशील, या प्रकाशनाद्वारे, याद्वारे समस्त जनतेला आमंत्रित करीत आहेत की, जर कोणत्याही व्यक्तीला सदर फ्लॅट आणि / किंवा शेअर्स किंवा त्याच्या कोणत्याही भागच्या संदर्भात वारसाहक्क, हिस्सा, विक्री, खरेदी, तारण, पट्टा, धारणाधिकार, अनुज्ञप्ती, उपहार, जप्ती किंवा कोणताही भार किंवा अन्यथा कोणत्याही मार्गाने कोणता दावा किंवा अधिकार, हक्क, हित असल्यास, सदर सूचना प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून १५ (पंधरा) दिवसात निम्नस्वाक्षरीकारांना आवश्य दस्तावेजी पुराव्यांसोबत तसे कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास असे सर्व अधिकार सोडून देण्यात आणि / किंवा परित्याग करण्यात आल्याचे समजण्यात येईल आणि आमच्या अशीलांवर बंधनकारक राहणार नाही.

(राजेंद्र सिंग राजपुरोहीत)
ॲडव्होकेट हाय कोर्ट, मुंबई
दुकान क्र. ९, अस्मिता ओरियंण्ट सीएचएस लि., अस्मिता क्लब जवळ, मिरा रोड (पू.), ठाणे : ४०११०७

जाहीर सूचना

आम जनतेस याद्वारे सूचित करण्यात येते की, माझे अशील **लीव्ह वेल सीएचएसएल त्यांच्या मार्फत अध्यक्ष इबरार हुसैन लाल मोहम्मद खान व अन्य यांना सोसायटी नोंदणीकरण धारक क्र. बीओएम/एचएसजी/३३८५/ मार्च २, १९७२** अंतर्गत सोसायटी **लीव्ह वेल सीएचएसएल अंतर्गत आहे व अध्यक्ष इबरार हुसैन लाल मोहम्मद खान व अन्य** यांच्या मार्फत त्यांचे सभासद यांना विकास हक्क **आयकॉन कन्स्ट्रक्शनचे हक्क व अब्दुल्लाह हबीब सुनेसारा व अन्य** व विकास करार दि. १७.१०.२०२२ अंतर्गत दसतावेज क्र. बीडीआर/१६/१२३९७/२०२२ नोंदणीकरण दि. १७.१०.२०२२ अंतर्गत आहे.

वरील संदर्भित अनुसूची :

सर्व तो भाग व भूखंड असलेली जमिन धारक प्लॉट क्र. १ व सीटीएस क्र. ५३८/२३ मोजमापित अंदाजे ६३०.६ चौरस मीटर धारक गाव ओशिवारा, तालूका अंधेरी येथील फिश मार्केट समोर, बेहराम बाग रोड, जोगेश्वरी (पश्चिम) मुंबई ४०० १०२.

जर कोणाही व्यक्तीस सदर सोसायटी संबंधात कायदेशीर वारस असल्यास तसेच कोणतेही दावे वा कोणतेही हक्क, अधिकार वा दावे, आक्षेप, कायदेशीर वारस असल्यास त्यांनी मला सदर जाहीर सूचनेच्या प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसांच्या आत संबंधित दस्तावेजांसह मला संपर्क साधावा अन्यथा कोणतेही दावे वा हक्क नसल्याचे गृहित धरले जाईल व सदर अधित्यागीत मानले जाईल.

रत्नाकर टी. मिश्रा
(वकील उच्च न्यायालय)

दि. ०६.०९.२०२४
कार्यालय : एसीबीए, ३ रा मजला, एम. एम. कोर्ट, अंधेरी, अंधेरी (पूर्व), मुंबई ६९.

जाहीर सूचना

सूचना याद्वारे देण्यात येते की, मूळ शेअर प्रमाणपत्र क्र. ४८ धारक पाच संपूर्ण प्रदानित शेअर्स रु. ५०/– प्रत्येकीचे विभिन्न क्र. **२३६ ते २४०** (दोन्ही समाविष्ट) धारक फ्लॅट क्र. ७/ए मोजमापित ५६५ चौ. फूट चटई क्षेत्रफळ, १ ला मजला, बिल्डींग **नवरंग को–ऑप. हा. सो. लि.** म्हणून ज्ञात, पारेख लेन, कांदिवली (पश्चिम), मुंबई ४०० ०६७ संबंधातील गहाळ/ हरवले आहेत व सध्याचे मालक **श्री. प्रकाशंद्र जावेरचंद सिंघवी व श्रीम. उलाशदेवी प्रकाशंद्र सिंघवी** हे आहेत.

सर्व व्यक्तींना वरील निर्देशित शेअर प्रमाणपत्र क्र. ४८ संबंधात कोणतेही दावे, हक्क, अधिकार व/वा हितसंबंध असल्यास वा मागण्या असल्यास तसेच वारसा, विक्री, गहाण, प्रभार, न्यास, धारणाधिकार, ताबा, भेट, देखभाल, भाडेकरार, जप्ती वा अन्य काही असल्यास त्यांनी याद्वारे सदर लेखी स्वरूपात अधोहस्ताक्षरित यांना त्यांचा पत्ता दुकान क्र. १४, आकृती अपार्टमेंट, मथुरदास रोड, कांदिवली (पश्चिम), मुंबई ४०० ०६७ येथे सूचित करणे आवश्यक आहे व तसेच वरील निर्देशित सोसायटीस सदर तारखेपासून १५ दिवसांच्या आत सूचित करावे अन्यथा जर काही दावे असल्यास ते अधित्यागीत व/वा परित्यागीत मानले जातील.

दि. ०६.०९.२०२४ सही/–
(श्रीम. राशिदा वाय. लक्ष्मीधर)
वकील

जाहीर सूचना

सूचना याद्वारे देण्यात येते की, २ मूळ दस्तावेज अर्थात १. विक्री करार दि. २९ एप्रिल, १९८२ चे करार **मेसर्स अलंकार कन्स्ट्रक्शन कंपनी** व २. आर्टिकल करार दि. २० मार्च, १९९३ चे श्री. किरीट कालीदास शाह व श्रीम. शांताबेन मनुभाई पटेल, **मे. रिजेंट प्लास्टीक्सचे** भागीदार यांच्या दरम्यान व **मे. मुद्रा लीज फायनान्स ॲन्ड इन्वेस्टमेंट कंपनी लि.** यांच्या दरम्यान युनिट क्र. १९–ए माजमापित ७९८ चौ. फूट बिल्ट अप क्षेत्रफळ, तळ मजला, बिल्डींग **बालाजी इंडस्ट्रीयल प्रीमायसेस को–ऑप. सो. लि.** म्हणून ज्ञात, हनुमान नगर, आकुर्ली गाव, कांदिवली (पूर्व), मुंबई ४०० १०१ येथील मालमत्तेच्या संबंधात होते ते गहाळ/ हरवले आहेत.

सर्व व्यक्तींना वरील निर्देशित गहाळ/ हरवलेले मूळ करार संबंधात कोणतेही दावे, हक्क, अधिकार व/वा हितसंबंध असल्यास वा मागण्या असल्यास तसेच वारसा, विक्री, गहाण, प्रभार, न्यास, धारणाधिकार, ताबा, भेट, देखभाल, भाडेकरार, जप्ती वा अन्य काही असल्यास त्यांनी याद्वारे सदर लेखी स्वरूपात अधोहस्ताक्षरित यांना त्यांचा पत्ता दुकान क्र. १४, आकृती अपार्टमेंट, मथुरदास रोड, कांदिवली (पश्चिम), मुंबई ४०० ०६७ येथे सूचित करणे आवश्यक आहे व तसेच वरील निर्देशित सोसायटीस सदर तारखेपासून १५ दिवसांच्या आत सूचित करावे अन्यथा जर काही दावे असल्यास ते अधित्यागीत व/वा परित्यागीत मानले जातील.

दि. ०६.०९.२०२४ सही/–
(श्रीम. राशिदा वाय. लक्ष्मीधर)
वकील

आदी इंडस्ट्रीज लिमिटेड

सीआयएन : L25203MH1994PLC206053
नोंदणीकृत कार्यालय – ४२१, ४ था मजला, कैलाश प्लाझा बिल्डिंग, वल्लभबाग लेन, घाटकोपर (पूर्व), मुंबई – ४०० ०७७.
दूर. + ९१ ९८६९४४१११८
वेबसाइट : www.aadiindustries.co, ई–मेल : aadi.industries@hotmail.com

सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, कंपनी कायद्याच्या तरतुदी, अन्य विनियमन व अन्यलागू कायदे यांच्या अनुपालनांतर्गत, कंपनी ३० वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) सोमवार, दि. ३०.०९.२०२४ रोजी दु. १२.०० वा. (भा. प्र.वे.) त्यांचे नोंदणीकृत कार्यालय ४२१, ४ था मजला, कैलाश प्लाझा बिल्डिंग, वल्लभबाग लेन, घाटकोपर (पूर्व), मुंबई – ४०० ०७७ येथे आयोजित करीत आहे.

कंपनीच्या सभासदांची एजीएम सोमवार, दि. ३०.०९.२०२४ रोजी दु. १२.०० वा. (भा. प्र.वे.) प्रत्यक्ष स्वरूपात एजीएम आयोजित करणाऱ्यासूचनेत विहित विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी ४२१, ४ था मजला, कैलाश प्लाझा बिल्डिंग, वल्लभबाग लेन, घाटकोपर (पूर्व), मुंबई – ४०० ०७७ येथे आयोजित करण्यात येत आहे. एजीएमच्या सूचनेची ई –प्रत व अन्य वैधानिक अहवाल कंपनीची वेबसाइट www.aadiindustries.com वर एनएसडीएलची वेबसाइट www.evoting.nsdl.com वर उपलब्ध आहेत. त्याचबरोबर एजीएमची सूचना कंपनीच्या सीक्युरिटीज् लिस्टेड असलेल्या स्टॉक एक्सचेंजची वेबसाइट www.bseindia.com वरही उपलब्ध आहे.

कंपनी कायदा, २०१३ चे अनुच्छेद १०३ अंतर्गत सभेमध्ये प्रत्यक्ष स्वरूपात उपस्थित राहणारे सभासद कोरमकरिता गणले जातील. ज्या सभासदांचे ई–मेल पत्ते कंपनी/रजिस्ट्रार व ट्रान्सफर एजंट्स ('रजिस्ट्रार')/ डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स ('डीपीज्') यांच्याकडे नोंदवलेले असतील अशा सभासदांना एजीएमची सूचना इलेक्ट्रॉनिक स्वरूपात पाठवण्यात आली आले.

सेबी परिपत्रकानुसार, कोणाही सभासदास एजीएमच्या सूचनेच्या कागदोपत्री प्रती पाठवण्यात येणार नाहीत. ज्यासभासदांनी अजूनही ई–मेल पत्ते नोंदवलेले नसतील त्यांनी एजीएमची सूचना इलेक्ट्रॉनिक स्वरूपात प्राप्त करण्यासाठी rnt.helpdesk@linkintime.com येथे विनंती पाठवून कंपनीचे आरटीए यांच्याकडे (लिंक इनटाइम इंडियाप्रायव्हेट लिमिटेड) त्यांचे ई–मेल पत्ते नोंदणीकृत करावेत.

कृपया नोंद घ्यावी की, नोंदणीकृत ई–मेल आयडी केवळ एजीएमची सूचना प्राप्त करणे, एजीएममध्ये इलेक्ट्रॉनिक माध्यमातून सहभाग घेणे व मत देणे यांकरिताच विचारात घेतले जातील. दूरस्थ ई–मतदान व एजीएम मध्ये उपस्थित राहण्याकरिताचा यूजर आयडी व पासवर्ड सभासदांना एनएसडीएलद्वारे त्यांच्या नोंदणीकृत ई–मेल आयडीवर पाठवण्यात येईल.

कंपनी आपल्या सभासदांना एनएसडीएलची दूरस्थ ई–मतदान सुविधा उपलब्ध करून देतआहे व सर्वसभासद एजीएमच्या सूचनेत विहित विषयांवर एजीएममध्ये मतपत्रिकेद्वारे मत देऊ शकतील. त्याचबरोबर, कंपनी आपल्या सभासदांना सभेपूर्वी दूरस्थ ई–मतदानाचीही सुविधा देतआहे. एजीएमपूर्वी दूरस्थ ई–मतदानाची विस्तृत प्रक्रिया सूचनेत दिलेली आहे.

आदी इंडस्ट्रीज लिमिटेड करिता
सही/–
ऋषभ शाह
व्यवस्थापकीय संचालक
(डीआयएन : ०१९४४३९०)

ठिकाण : मुंबई
दिनांक : ०५.०९.२०२४

नेटलिंक सोल्यूशन्स (इंडिया) लिमिटेड

नोंदणीकृत कार्या.: ५०७, लक्ष्मीप्लाझा, लक्ष्मी इंडस्ट्रियल इस्टेट, न्यूलिंक रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई- ४०० ०५३, महाराष्ट्र, **सीआयएन: एल४५२००एमएच१९८४पीएलसी३४७८९;**
दूर.: ०२२-२६३३५५८३/८४; **ई-मेल:** netlink@easy2source.com; **वेबसाइट:** www.nsil.co.in

३९वी वार्षिक सर्वसाधारण सभा आणि रिमोट ई-वोटिंगची सूचना

येथे सूचना देण्यात येत आहे की, कंपनीच्या सदस्यांची ३९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) सोमवार, ३० सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता (भाप्रवे) व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी) अन्य दृकश्राव्य माध्यम (ओएव्हीएम) द्वारे कंपनीची एजीएम बोलावण्याच्या सूचनेमध्ये निर्दिष्ट केलेल्या व्यवसायांवर विचारविमर्श करण्याकरिता आयोजित केली जाईल. कंपनीने ०५ सप्टेंबर २०२४ रोजी एजीएम सूचना आणि ई-वोटिंग प्रक्रियेसह वित्तीय वर्ष २०२३-२४ करिताचा कंपनीचा वार्षिक अहवाल इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पाठवला आहे, ज्या सदस्यांचे ईमेल पत्ते कंपनी कायदा, २०१३ (अधिनियम) च्या लागू तरतुदींचे पालन करून कंपनी/डिपॉझिटरीजमध्ये नोंदणीकृत होते. सहकार मंत्रालयाने जारी केलेल्या परिपत्रकांचे आणि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडियाने जारी केलेल्या सेबी परिपत्रकांचे पालन करून.

कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १०८ सहवाचिता कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ च्या नियम २० आणि सिक्युरिटीज एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टींग ऑब्लिगेशन्स अँण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) विनियम, २०१५ चे नियमन ४४ आणि इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटिरीज ऑफ इंडियाच्या सर्वसाधारण सभेवरील सचिवीय मानक (एसएस-२) चे अनुपालनात कंपनी नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) च्या ई-व्होटिंग सेवांद्वारे इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदानाचा हक्क बजावण्यासाठी आपल्या सदस्यांना सुविधा प्रदान करत आहे.

रिमोट ई-वोटिंग प्रारंभाची तारीख	गुरुवार, २६ सप्टेंबर, २०२४ सकाळी ९:०० वाजता (भाप्रवे)
रिमोट ई-वोटिंग समाप्तीची तारीख	रविवार, सप्टेंबर २९, २०२४ रोजी संध्याकाळी ५:०० वा. (भाप्रवे)

कारवाईचे तपशील खालीलप्रमाणे आहेत:

१. कट-ऑफ तारखेनुसार, डीमटेरियलायझेशन स्वरूपात शेअर्स धारण करणारे सदस्य म्हणजे, सोमवार, २३ सप्टेंबर, २०२४ हे आहेत (पात्र सदस्य), एजीएम बोलावण्याच्या सूचनेमध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही किंवा सर्व व्यवसायावर एजीएममध्ये रिमोट ई-व्होटिंग आणि ई-व्होटिंग प्रणालीद्वारे त्यांचे मतदान करण्याचा अधिकार वापरण्यासाठी पात्र आहे.

२. रिमोट ई-वोटिंग गुरुवार, २६ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ९.०० वाजता सुरू होईल;

३. रिमोट ई-वोटिंग रविवार, २९ सप्टेंबर २०२४ रोजी संध्याकाळी ५.०० वाजता संपेल.

४. रिमोट ई व्होटिंग पध्दत त्यानंतर मतदानासाठी अक्षम केले जाईल आणि सदस्याने ठरावावर मत दिल्यानंतर, त्याला/तिला नंतर ते बदलण्याची किंवा पुन्हा मतदान करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

५. रिमोट ई-व्होटिंगद्वारे मतदानाचा हक्क बजावल्यानंतरही सभासद एजीएममध्ये भाग घेऊ शकतात परंतु ते पुन्हा एजीएममध्ये आपले मत देऊ शकत नाहीत.

६. एजीएम दरम्यान ई-व्होटिंगची सुविधा देखील उपलब्ध करून दिली जाईल आणि जे सदस्य व्हीसी सुविधेद्वारे एजीएममध्ये उपस्थित असतील, ज्यांनी रिमोट ई-व्होटिंगद्वारे ठरावांवर आपले मत दिले नाही आणि अन्यथा असे करण्यास प्रतिबंधित केले नाही ते एजीएम दरम्यान ई-व्होटिंग प्रणालीद्वारे मतदान करण्यासाठी पात्र असतील.

७. ज्या व्यक्तीचे नाव सभासदांच्या रजिस्टरमध्ये किंवा डिपॉझिटरीजने ठेवलेल्या लाभार्थी मालकाच्या नोंदणीमध्ये निश्चित तारखेनुसार म्हणजेच सोमवार २३ सप्टेंबर २०२४ रोजी नोंदवलेले असेल तीच - एजीएम दरम्यान मतदान रिमोट ई-व्होटिंग तसेच ई-व्होटिंगच्या सुविधेचा लाभ घेण्यास पात्र असेल.

८. जे सदस्य वास्तविक स्वरूपात शेअर्स धारण करत आहेत किंवा ज्यांनी त्यांचा ईमेल पत्ता कंपनी / डिपॉझिटरीकडे नोंदणीकृत केलेला नाही किंवा कंपनीचे शेअर्स घेणारी आणि कंपनीने इलेक्ट्रॉनिक पद्धतीने नोटीस पाठवल्यानंतर कंपनीचा सदस्य बनणारी कोणतीही व्यक्ती कट ऑफ तारखेनुसार, म्हणजे सोमवार, २३ सप्टेंबर २०२४, असे सदस्य evoting@nsdl.co.in वर विनंती पाठवून यूजर आयडी आणि पासवर्ड मिळवू शकतात. तथापि, ई-मतदानासाठी सदस्य आधीच एनएसडीएल मध्ये नोंदणीकृत असल्यास, विद्यमान वापरकर्ता आयडी आणि पासवर्ड मतदानासाठी वापरला जाऊ शकतो.

९. तात्पुरत्या आधारावर ईमेल पत्ता, बँक तपशील आणि मोबाइल नंबर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने अपडेट करण्याच्या संबंधात कृपया आमच्या आरटीए ला ईमेल लिहा म्हणजे ॲडॉर्डेट कॉर्पोरेट सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडला त्याच्या ईमेल आयडीवर म्हणजे info@adroitcorporate.com आणि ईमेल ॲड्रेस, बँक तपशील आणि मोबाईल नंबर अपडेट करण्याच्या अधिक तपशीलांसाठी तुम्ही एजीएमची सूचना पाहू शकता.

१०. एजीएमच्या सूचनेसह वित्तीय वर्ष २०२३-२४ चा वार्षिक अहवाल कंपनीच्या वेबसाइट www.nsil.co.in आणि स्टॉक एक्स्चेंज अर्थात बीएसई च्या www.bseindia.com वेबसाइटवर आणि एनएसडीएलच्या evoting@nsdl.co.in वेबसाईट वर उपलब्ध आहे.

ई-व्होटिंगशी संबंधित कोणत्याही शंका/तक्रारींच्या बाबतीत सदस्य/लाभार्थी मालक एनएसडीएलशी evoting@nsdl.co.in/१८००-२२२-९९० वर संपर्क साधू शकतात किंवा श्री. अभिजीत गुंजाळ, सहाय्यक व्यवस्थापक-एनएसडीएल यांच्याशी ई-व्होटिंगवर evoting@nsdl.co.in/०२२-२४९९४८३५ वर संपर्क साधू शकतात.

सही/-
मिनेश मोदी
पूर्णवेळ संचालक
डीआयएन: ००३७८३७८

ठिकाण: सॅन फ्रान्सिस्को
दिनांक: ०६ सप्टेंबर २०२४

जाहिर सूचना

(इनसॉल्व्हन्सी ॲण्ड बँकरप्टसी संहित २०१६ चे कलम १०२ अन्वये)

श्री. दीपक कुमार बैद, वैयक्तिक जामिनदार मे. सिद्धी विनायक लॉजिस्टिक्स लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता

संबंधीत तपशिल

१.	वैयक्तिक जामीनदाराचे नाव (पीजी)	श्री. दीपककुमार बैद
२.	ओळख/कायम खाते क्रमांक	एजीयूपीबी३५१९पी
३.	पीजीच्या निवासस्थानाचा पत्ता	अ. १०१, मेघ मल्हार अपार्ट. भटार चार रास्ता, सुरत, गुजरात-३९५००१ ब. फ्लॅट क्र. एफ-५०१, ५वा मजला, साई रेसिडेन्सी, सेक्टर-१५,सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४
४.	निर्णय घेणाऱ्या प्राधिकरणाच्या आदेशाचा तपशील	माननीय एनसीएलटी अहमदाबाद विभागीय खंडपीठ न्यायालय -१ ने मे.सिद्धी विनायक लॉजिस्टिक्स लिमिटेडचे वैयक्तिक जामीनदार श्री. दीपक कुमार बैद यांच्या विरुद्ध दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया मान्य केली, आय.ए.क्र.सीपी(आयबी)/३६ (एएचएम)२०२४ मधील ३०८ (एएचएम) २०२४ दिनांक ०३.०९.२०२४ नुसार.
५.	आयबीसी, २०१६ अंतर्गत पीजीच्या संदर्भात दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया सुरू झाल्याची तारीख	दि.०३.०९.२०२४ (आदेशाची प्रत ०३.०९.२०२४ रोजी प्राप्त झाली)
६.	रिझोल्यूशन प्रोफेशनलचे नाव आणि नोंदणी क्रमांक	श्री. इकबाल सिंग गांधी, रजि. क्र.आयबीबीआय/आयपीए-००१/आयपी-पी-०२३६५/२०२१-२०२२/१३५२४
७.	बोर्डाकडे नोंदणीकृत रिझोल्यूशन व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल	नोंद. पत्ता- सी/३०२, रोझवुड इस्टेट, प्रेमतीर्थ जैन देरासर जवळ, सॅटेलाइट, अहमदाबाद, गुजरात, ३८०००१५ ईमेल: iqbalsingh2659@yahoo.co.in
८.	रिझोल्यूशन व्यावसायिकांशी पत्रव्यवहार	पत्ता - ९/बी, वरदान कॉम्प्लेक्स, लखुडी सर्कल,
	करण्यासाठी पत्ता आणि ई-मेल वापरला जाईल	नवरंगपुरा, अहमदाबाद - ३८०००१४
		ईमेल: pgdeepakbaid@gmail.com
९.	दावे सादर करण्याची शेवटची तारीख	२७.०९.२०२४
१०.	संबंधित फॉर्म येथे उपलब्ध आहेत:	वेब लिंक: https://ibbi.gov.in/en/home/downloads

याद्वारे नोटीस दिली जाते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाने आयबीसी, २०१६ चे १०० अन्वये श्री. दीपक कुमार बैद यांच्या दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दि.०३.०९.२०२४ रोजी दिले आहेत. (०३.०९.२०२४ रोजी आदेश प्राप्त झाले).

मे. सिद्धी विनायक लॉजिस्टिक लिमिटेड चे धनको श्री. दीपक कुमार बैद यांचे वैयक्तिक जामीनदाराला दि.२७.०९.२०२४ रोजी किंवा त्यापूर्वी पुराव्यासह त्यांचे दावे एंट्री क्र.८ विरुद्ध नमूद केलेल्या पत्त्यावर रिझोल्यूशन प्रोफेशनलकडे सादर करण्याचे आवाहन केले आहे. कर्जदार त्यांचे दावे पुराव्यासह आणि वैयक्तिक माहितीसह इलेक्ट्रॉनिक संप्रेषणाद्वारे किंवा कुरिअर, स्पीड पोस्ट किंवा नोंदणीकृत पत्राद्वारे सादर करतील. दाव्याचे खोटे किंवा दिशाभूल करणारे पुरावे सादर केल्यास दंड आकारला जाईल.

दिनांक: ०६.०९.२०२४ सही/-
ठिकाण: अहमदाबाद
श्री.इकबाल सिंग गांधी,
रिझोल्यूशन प्रोफेशनल
रजि. क्र.आयबीबीआय/आयपीए-००१/आयपी-पी-०२३६५/२०२१-२०२२/१३५२४
एएफए दि.३०.०६.२०२५ पर्यंत वैध

पारले इंडस्ट्रिज लिमिटेड

सीआयएन: एल२१०००एमएच१९८३पीएलसी०२९१२८
नोंदणीकृत कार्यालय: ३१०-३११, द अव्हेन्यू, मरोळ, अंधेरी पूर्व, मरोळ नाका, मुंबई, ४०००५९.
संपर्क: ०२२-२८७६९९८६,
ई-मेल :info@parleindustries.com, **वेबसाईट:** www.parleindustries.com

कंपनीच्या भागधारकांचे लक्ष वेधण्याकरिता भागधारकांना ४१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभा एजीएमची सूचना

येथे सूचना देण्यात येत आहे की, पारले इंडस्ट्रीज लिमिटेडची ४१वी वार्षिक सर्वसाधारण सभा ('एजीएम') सोमवार, ३० सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी १२:३० वाजता (भाप्रवे) व्हिडीओ-कॉन्फरन्सिंग/इतर ऑडिओ-व्हिज्युअल माध्यम ('व्हीसी/ओएव्हीएम') द्वारे सदस्यांच्या सामायिक ठिकाणी प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय, च्या अनुषंगाने सामान्य परिपत्रक बेअरिंग क्र. २०/२०२० दिनांक ०५ मे २०२०, ०२/२०२१ दिनांक १३ जानेवारी २०२१, १९/२०२१ दिनांक ०८ डिसेंबर २०२१, २१/२०२१ दिनांक १४ डिसेंबर २०२१, ०२/२०२२ दिनांक ०५ मे २०२२ आणि १०/२०२२ दिनांक २८ डिसेंबर २०२२ रोजीचे सहकार मंत्रालयाने जारी केलेले (एमसीए परिपत्रक) आणि १२ मे २०२० रोजीचे परिपत्रक, १५ जानेवारी २०२१, १३ मे २०२२ आणि ०५ जानेवारी २०२३ रोजीचे सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी परिपत्रक) द्वारे जारी केलेले च्या अनुषंगाने ४१वी एजीएम आयोजित करण्याच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या व्यवसायांवर विचारविमर्श करण्याकरिता होणार आहे.

वर नमूद केलेल्या एमसीए आणि सेबी परिपत्रके आणि कंपनी कायदा, २०१३ च्या संबंधित तरतुदी आणि सेबी (लिस्टींग ऑब्लिगेशन्स अँण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) विनियम, २०१५ चे पालन करून ४१वी एजीएम, ई-मतदानासाठीची प्रक्रिया आणि सूचना आणि वित्तीय वर्ष २०२३-२४ चा वार्षिक अहवाल अशा सूचनांची इलेक्ट्रॉनिक प्रत ज्या सदस्यांचे ईमेल आयडी कंपनी/डिपॉझिटरी सहभागीदार ('डीपी') मध्ये नोंदणीकृत आहे त्यांना पाठवले जाईल.

ज्या सदस्यांनी त्यांचा ई-मेल पत्ता नोंदणीकृत केलेला नाही, त्यांना विनंती आहे की त्यांनी ते नोंदणीकृत करावे:

- डीमॅट स्वरूपात असलेल्या शेअर्सच्या संदर्भ